AXIS BANK

देशव्यापी सखोल जनजागृती कार्यक्रम (नेशनवाईड इंटेन्सिव्ह अव्हेरनेस प्रोग्रॅम)

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया द्वारे नियंत्रित संस्थांच्या सहयोगाने एक जनजागृती उपक्रम

(01 नोव्हेंबर 2022 ते 30 नोव्हेंबर 2022)

अनुक्रमणिका

अनुक्रमांक	विषय	स्लाइड क्रमांक
1	अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा	3-4
2	वैकल्पिक तक्रार निवारण यंत्रणा	5-6
3	सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धती	7-11
4	फसवणूक प्रतिबंधात्मक उपाय	12-14
5	ग्राहक संरक्षण धोरण	15
6	बँकिंगमध्ये तंत्रज्ञानाचा वापर	16-17
7	ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांसाठी घरपोच (डोअरस्टेप) बँकिंग सेवा	18-19
8	एम.एस.एम.ई / स्वयं-सहाय्यता गटांना उपलब्ध बँकिंग सेवा	20

देशव्यापी सखोल जनजागृती कार्यक्रम (नेशनवाईड इंटेन्सिव्ह अव्हेरनेस प्रोग्रॅम)

काय करावे याबद्दल माहीत नाही का?

अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा

तक्रार निवारण करण्याचे पहिले चरण

- ✓ शाखा/ ए.टी.एम
- ✓ झटपट (इन्स्टंट) चॅट / एजंटशी चॅट करा
- ✓ आमच्याशी / कॉल सेंटरशी बोला
- ✓ ईमेलद्वारे कनेक्ट करा

तक्रार निवारण करण्याचे दुसरे चरण

- ✓ बँकेच्या नोडल ऑफिसरला पत्र लिहा
- ✓ तक्रारीचा फॉर्म डाउनलोड करा आणि त्यावर नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवा
- ✓ शाखेशी संबंधित तक्रारींसाठी, सर्कल नोडल ऑफिसरशी संपर्क करा
- ✓

तक्रार निवारण करण्याचे तिसरे चरण

- ✓ प्रिन्सिपल नोडल ऑफिसरपर्यंत तक्रार घेऊन जा
- ✓ पी.एन.ओ ला ईमेल पाठविण्यासाठी वेबसाइटवर क्लिक करून
- ✓ तक्रारीचा फॉर्म डाउनलोड करा आणि त्यावर नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवा



आर.बी.आय चे बँकिंग लोकपाल, म्हणजेच बँकिंगमधील तिसरे निर्णायक, यांच्याशी संपर्क साधा

1. जर बँकेने आपली तक्रार एका महिन्याच्या आत आपल्याला समाधान वाटेल अशा पद्धतीने सोडवली नाही, तर आर.बी.आय च्या बँकिंग लोकपालांशी संपर्क साधा
2. बँकिंग लोकपाल योजना ही आपल्या बँकिंग तक्रारींवर समाधान मिळविण्याची एक खर्च-मुक्त आणि त्रास-मुक्त पद्धत आहे
3. बँकिंग लोकपाल योजनेत बँकिंग सेवांमधील अनेक उणीवांचा समावेश आहे

वैकल्पिक तक्रार निवारण यंत्रणा
रिझर्व्ह बँक- अंतर्भूत लोकपाल योजना (इंटिग्रेटेड ओम्बड्समन स्कीम), 2021

आपल्याला कोणत्याही बँक किंवा एन.बी.एफ.सी यांच्या विरूद्ध तक्रार करायची असल्यास समाधान मिळविण्याचे चरण?

बैंक / एन.बी.एफ.सी

एक महिन्याच्या आत कोणताही उपाय मिळालेला नाही किंवा असमाधानकारक उपाय देण्यात आलेला आहे

आर.बी.आय लोकपाल यांचे कार्यालय

एक महिन्याच्या आत कोणताही उपाय मिळालेला नाही किंवा असमाधानकारक उपाय देण्यात आलेला आहे

अपीलीय प्राधिकरण

चरण 1

- बँक / एन.बी.एफ.सी शाखा यांच्याकडे किंवा वेबसाइटवर लेखी तक्रार दाखल करा
- बँका / एन.बी.एफ.सी यांनी आपली तक्रार सोडवण्याची 30 दिवस वाट पहा.
- बँका / एन.बी.एफ.सी यांनी दिलेले उपाय असमाधानकारक वाटत असतील तर चरण 2 वर जा

<u>एस्केलेशन मॅट्रिक्स</u>
शाखा व्यवस्थापक → विभागीय कार्यालय → मुख्य कार्यालय

चरण 2

- https://cms.rbi.org.in येथील तक्रार व्यवस्थापन प्रणाली पोर्टलवर बँका / एन.बी.एफ.सी विरूद्ध तक्रार दाखल करा. किंवा;
- सेंट्रलाइज्ड रिसीट अँड प्रोसेसिंग सेंटर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे हाताने लिहिलेल्या तक्रारी द्या
- तक्रारीशी संबंधित प्रश्नांसाठी 14448 या टोल फ्री नंबरवर कॉल करा

चरण 3

ग्राहक जर का लोकपालांनी दिलेल्या समाधानाने खुश नसेल तर 30 दिवसांच्या आत त्याला अपीलीय प्राधिकरणासमोर अपील दाखल करता येईल

अपीलीय प्राधिकरण हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (आर.बी.आय चे) डेप्युटी गव्हर्नर आहेत.)

सुरक्षित डिजिटल बँकिंग

- आपले पासवर्ड, पिन, ओ.टी.पी, सी.व्ही.व्ही इत्यादी कोणालाही ऑनलाइन किंवा फोनद्वारे सांगू नका
- एस.एम.एस ने, ईमेल द्वारे किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्याला मिळालेल्या कोणत्याही संशयास्पद लिंक वर कधीही क्लिक करू नका

सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धती

सुरक्षित बँकिंग पद्धतींसाठी काय करावे

- ✓ नेहमी बँका / सेवा प्रदात्याच्या अधिकृत वेबसाइटवर जा आणि सुरक्षित वेबसाइट्स वापरा उदाहरणार्थ https:// - ज्यामध्ये 'एस' चा अर्थ सुरक्षित वेबसाइट असा असतो
- ✓ जर आपल्या मोबाइल / लॅपटॉप / पी.सी ला किंवा ॲप्स डाउनलोड करताना तांत्रिक अडचणी येत असतील तर सर्व पेमेंट / फायनान्शियल ॲप्समधून लॉग आउट करा
- ✓ बँका किंवा ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मसारख्या फसव्या, बनावट आणि तशाच दिसणाऱ्या वेबसाइट्स टाळण्यासाठी प्रवेश केल्या जाणाऱ्या वेबसाइट्स / यू.आर.एल चे स्पेलिंग तपासून पहा
- ✓ ईमेल अस्सल पत्त्यांचे आहेत याची खात्री करण्यासाठी मिळालेल्या ईमेलचे स्पेलिंग आणि हेडर्स तपासा
- ✓ एस.एम.एस/ व्हॉट्सॲप/ईमेल इत्यादींद्वारे मिळालेल्या संक्षिप्त यू.आर.एल/गुगल फॉर्मवर क्लिक करताना सावधानता बाळगा
- ✓ बँक / ईकॉमर्स / शोध इंजिन वेबसाइट्सला लिंक्स प्रदान करणाऱ्यांना ब्लॉक / अनसबस्क्राइब करा / स्पॅम मेल्स म्हणून रिपोर्ट करा
- ✓ ऑनलाइन उत्पादनांची खरेदी/विक्री करताना सावधानता बाळगा. यू.पी.आय द्वारे पैसे प्राप्त करण्यासाठी पिन / पासवर्ड लिहिण्याची गरज नसते
- ✓ नियमित वातावरणात बराच काळ आपल्या फोनमध्ये मोबाइल नेटवर्क नसल्यास ताबडतोब आपल्या मोबाइल ऑपरेटरशी संपर्क साधा
- ✓ आपल्या माहितीशिवाय कोणताही ओ.टी.पी निर्माण होणार नाही याची खात्री करण्यासाठी एस.एम.एस / ईमेल नियमितपणे तपासत रहा
- ✓ कोणत्याही कंपनीशी व्यवहार करण्यापूर्वी, त्या नोंदविलेल्या आणि परवानाधारक संस्था आहेत की नाही हे तपासून पहा
- ✓ जिथे जिथे अशी सुविधा उपलब्ध असेल तेथे दोन घटक प्रमाणीकरण (टू फॅक्टर ऑथेंटिकेशन) चालू करा
- ✓ ए.टी.एम वापरताना, पिन घालताना आपल्या दुसऱ्या हाताने कीपॅड झाका
- ✓ रोख रक्कम बाहेर न आल्यास ए.टी.एम वर 'कॅन्सल' दाबा आणि होम स्क्रीन दिसल्यानंतरच तेथून बाहेर पडा
- ✓ लक्षात असू द्या की ग्राहक सेवा क्रमांक कधीही मोबाइल नंबरच्या स्वरूपात नसतात
- ✓ सी.डी.एम मध्ये रोख रक्कम जमा करताना, तेथून बाहेर जाण्याआधी मशीनने रोख रक्कम स्वीकारलेली आहे याची खात्री करून घ्या
- ✓ ए.टी.एम मशीनच्या कार्ड इन्सर्शन स्लॉट किंवा कीपॅड जवळ कोणतेही अतिरिक्त डिव्हाइस जोडलेले आहे का, हे नेहमी तपासा

सुरक्षित डिजिटल बँकिंग पद्धती

❌ सुरक्षित बँकिंग पद्धतींसाठी काय करू नये

- ❖ अनोळखी लोकांवर विश्वास ठेवू नका आणि ए.टी.एम मध्ये त्यांची मदत घेऊ नका कारण क्रेडेन्शियल्स चोरले जाऊ शकतात
- ❖ सिम कार्ड आणि मोबाइल नंबरचा तपशील सांगू नका किंवा ए.टी.एम कार्डवर पिन लिहू नका किंवा वेबसाइट्स / डिव्हाइस / सार्वजनिक लॅपटॉप / डेस्कटॉपवर तपशील सेव्ह करू नका
- ❖ बँका, विमा, सरकार इत्यादींकडून कॉल सेंटर एजंट म्हणून काम करत आहोत असे सांगणाऱ्या व्यक्तींच्या ऑफर्समध्ये अडकू नका आणि वापरकर्ता नाव, पासवर्ड, कार्डचे तपशील / पिन / सी.व्ही.व्ही / ओ.टी.पी, जन्मतारीख, आधार क्रमांक, कुटुंबातील सदस्यांची नावे इत्यादी सांगण्यासाठीच्या दबावात येऊ नका / फसू नका.
- ❖ शोध इंजिन, एस.एम.एस, सोशल मीडिया, ईमेल्स इत्यादींमधून सेवा प्रदात्यांचे संपर्क तपशील शोधू नका.
- ❖ अज्ञात / सत्यापित न केलेल्या लिंकवर क्लिक करू नका आणि अज्ञात लोकांच्या सल्ल्यानुसार अप्रमाणित स्त्रोतांमधून ॲप्स डाउनलोड करू नका
- ❖ आपली बँक खाती/ ए.टी.एम कार्ड इतरांकडून कमिशनसाठी किंवा इतरांसाठी वापरण्याची परवानगी देऊ नका, ज्यामुळे पैसे काढण्यासाठी बँक खात्याचा गैरवापर झाल्यामुळे पोलिस तपास होऊ शकतो
- ❖ आपले के.वाय.सी तपशील / खात्याचा तपशील / ए.टी.एम कार्ड तपशील / पिन / सी.व्ही.व्ही / ओ.टी.पी तपशील मागणाऱ्या कॉल्स / ईमेल्स / एस.एम.एस ला प्रतिसाद देऊ नका
- ❖ अविश्वसनीय लॉटरी ऑफरवर विश्वास ठेवू नका आणि अशा ईमेल / कॉलला प्रतिसाद म्हणून सुरक्षित क्रेडेन्शियल्स सांगू नका
- ❖ आर.बी.आय कडे मोठी रक्कम पडून आहे आणि ती मिळवण्याकरिता काही रक्कम स्थानांतरित करणे गरजेचे आहे, असा दावा करणाऱ्या संदेशांना प्रतिसाद देऊ नका
- ❖ आगाऊ कर्ज प्रक्रिया शुल्क रोख स्वरूपात भरून फसवणूक करून घेऊ नका
- ❖ पैसे / मोबाइल बॅलन्स रिचार्ज / नोकरी मिळविण्यासाठी के.वाय.सी अद्ययावत करणे आहे अशा आणि बक्षिसाची रक्कम, सरकारी मदत देऊ करणाऱ्या / आश्वासन देणाऱ्या संदेशांना प्रतिसाद देऊ नका
- ❖ कमी व्याज दराने / सुरक्षित त्वरित कर्जाच्या ऑनलाइन ऑफरसाठी देयके भरू नका किंवा सुरक्षित क्रेडेन्शियल्स लिहू नका
- ❖ ज्या डिव्हाइसवर फायनान्शियल ॲप्स वापरले जात आहेत त्याच डिव्हाइसवर स्क्रीन शेअरिंग ॲप्स वापरू नका
- ❖ अज्ञात पेमेंट ॲप्स वापरुन क्यू.आर कोड स्कॅन करू नका जे यू.पी.आय पिन लिहिल्यावर पैसे स्थानांतरित करण्यासाठी वापरले जाऊ शकतात
- ❖ सार्वजनिक चार्जिंग पॉईंट्स किंवा असुरक्षित वाय-फाय वापरू नका कारण त्यांचा वापर मालवेअर स्थानांतरित करण्यासाठी आणि फोनमधून डेटावर नियंत्रण ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो

इलेक्ट्रॉनिक बँकिंग

काय करावे

- पेमेंट्ससाठी केवळ सत्यापित आणि विश्वासार्ह ब्राउझर आणि एच.टी.टी.पी.एस सुरक्षित वेबसाइट्स वापरुन नेहमीच आपल्या बँकेचे यू.आर.एल टाइप करा (एस म्हणजे सुरक्षित). यू.आर.एल विंडो (प्रतिमा) मध्ये सुरक्षित चिन्ह (लॉक) शोधा
- अल्फान्यूमेरिक आणि विशेष वर्ण (#.", @. $ इत्यादी) वापरून आपल्या पासवर्डचा अंदाज लावणे कठीण करा
- आपण वारंवार आपला पासवर्ड बदलत आहात याची खात्री करून घ्या
- आपले पेमेंट व्यवहाराचे ॲप्स (बँका, बिगर-बँका, वॉलेट्स इ.) नेहमी नवीनतम आवृत्तीसह अद्यतनित करून ठेवा
- आपला मोबाइल नंबर आणि ईमेल आय.डी आपल्या बँक खात्याशी लिंक करा आणि एस.एम.एस / ई-मेल अलर्ट सेवा निवडा
- कोणताही असामान्य/अनधिकृत व्यवहार झाल्यास, ताबडतोब बँकेला कळवा

काय करू नये

- ऑनलाइन शोधाद्वारे आपल्या बँकेच्या वेबसाइटवर कधीही जाऊ नका.
- फोनवर लॉगिन क्रेडेन्शियल्स कधीही साठवून ठेवू नका, अविश्वासार्ह पोर्टलवर / सेवा प्रदात्यांकडे क्रेडेन्शियल्स लिहू नका / साठवून ठेवू नका
- सार्वजनिक उपकरणे, सायबर कॅफे आणि सार्वजनिक / विनामूल्य वायफाय सारख्या असुरक्षित / खुल्या नेटवर्कवर व्यवहार करणे टाळा
- आपला मोबाइल बँकिंग पिन किंवा इंटरनेट बँकिंग आय.डी, पासवर्ड आणि ओ.टी.पी कधीही (बँक कर्मचाऱ्यांसह) कोणालाही सांगू नका

युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यू.पी.आय)

काय करावे

- यू.पी.आय ॲप अद्यतनित करून ठेवा
- व्यापाऱ्याची / व्यक्तीची गोळा करण्याची विनंती स्वीकारण्याआधी त्याचा नेहमी आढावा घ्या
- पाठविण्याआधी रक्कम आणि लाभार्थी पुन्हा तपासा आणि पुन्हा पुष्टी करून घ्या

काय करू नये

- आपला पिन कधीही कोणालाही सांगू नका
- प्राप्तकर्त्याला प्रथम सत्यापित केल्याशिवाय / त्याची पुन्हा पुष्टी केल्याशिवाय पैसे पाठवविणे टाळा

ग्राहक जागरूकता - सायबर धोके आणि फसवणूक

फसवणूक करणारे हे युजर आय.डी, लॉगइन/ ट्रान्झॅक्शन पासवर्ड, ओ.टी.पी (वन टाइम पासवर्ड), डेबिट/ क्रेडिट कार्डचा तपशील जसे की पिन, सी.व्ही.व्ही, मुदत समाप्तीची तारीख (एक्सपायरी डेट) आणि इतर वैयक्तिक माहिती सारखी गोपनीय माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतात. फसवणूक करणाऱ्यांकडून वापरल्या जाणाऱ्या काही विशिष्ट कार्यपद्धती अशा आहेत –

विशिंग - के.वाय.सी-अपडेशनच्या बहाण्याने, खाते / सिम-कार्ड अनब्लॉक करणे, डेबिट केलेली रक्कम जमा करणे इत्यादी यांकरिता गोपनीय तपशील सांगण्यासाठी ग्राहकांना आमिष दाखविण्याकरिता बँक / बिगर-बँक ई-वॉलेट प्रदाता / दूरसंचार सेवा प्रदात्यांकडून असल्याचे भासवणारे फोन कॉल्स

फिशिंग - फसवणूक केलेले ईमेल्स आणि / किंवा एस.एम.एस जे संप्रेषण त्यांच्या बँक / ई-वॉलेट प्रदात्याकडून उद्भवले आहे असा ग्राहकांना विचार करायला लावून फसवण्यासाठी डिझाइन केलेले असतात आणि त्यात गोपनीय तपशील काढण्यासाठी लिंक्स असतात

दुरस्थ प्रवेश (रिमोट ऍक्सेस) - त्या ग्राहकाच्या डिव्हाइसवरील ग्राहकांच्या सर्व डेटामध्ये प्रवेश करू शकेल असे त्यांच्या मोबाइल फोन/कॉम्प्युटरवर ऍप्लिकेशन डाउनलोड करण्याचे आमिष दाखवून.

पैसे मिळविण्यासाठी 'एंटर युवर यू.पी.आय पिन' अशा मेसेजसह बनावट पेमेंट रिक्वेस्ट पाठवून यू.पी.आय च्या 'कलेक्ट रिक्वेस्ट' फीचरचा गैरवापर करणे.

वेबपेजेस / सोशल मीडियावर बँका / ई-वॉलेट प्रदात्यांचे बनावट क्रमांक आणि शोध इंजिनद्वारे प्रदर्शित केलेले इत्यादी

फसवणूक झाल्यास उचलावी लागणारी पावले

आपल्या बँकेशी / एन.बी.एफ.सी शी संपर्क साधा आणि आपले खाते / कार्ड ताबडतोब ब्लॉक करा आणि लेखी तक्रार द्या

↓

इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरकडे तक्रार/ एफ.आय.आर नोंदवा किंवा सायबर क्राइम हेल्पलाईन क्रमांक 1930 वर कॉल करा

↓

लाभार्थी खात्यात रक्कम ब्लॉक करण्यासाठी आपल्या शाखेशी संपर्क साधा

↓

जर बँक / एन.बी.एफ.सी आपल्या तक्रारीवर समाधान काढण्यात अपयशी ठरले तर आर.बी.आय च्या लोकपालांकडे प्रकरण घेऊन जा.



डिजिटल/ऑनलाइन फसवणूक प्रतिबंध (फ्रॉड प्रिव्हेंशन)

- त्वरित अलर्ट मिळविण्यासाठी आपला मोबाइल नंबर आणि ईमेल आपल्या बँकेकडे नोंदवा
- मोबाइल, ईमेल किंवा पर्समध्ये कधीही महत्त्वाचा बँकिंग डेटा साठवून ठेऊ नका
- ऑनलाइन बँकिंगसाठी केवळ सत्यापित, सुरक्षित आणि विश्वासार्ह वेबसाइट वापरा
- सार्वजनिक, मुक्त किंवा विनामूल्य नेटवर्कद्वारे बँकिंग टाळा
- आपला ऑनलाइन बँकिंग पासवर्ड आणि पिन नियमितपणे बदलत रहा
- आपले ए.टी.एम कार्ड, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, प्रीपेड कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास ताबडतोब ब्लॉक करा

ग्राहक संरक्षण धोरण

प्रणाली आणि कार्यपद्धती बळकट करणे - इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहार करण्याबद्दल ग्राहकांना सुरक्षित वाटण्यासाठी बँकांमधील प्रणाली आणि कार्यपद्धती

- फसवणूक शोधण्याची आणि प्रतिबंध करण्याची तगडी आणि सक्रिय/दमदार (डायनॅमिक) यंत्रणा;
- अनधिकृत व्यवहारांमुळे उद्भवणाऱ्या धोक्यांचे (उदाहरणार्थ बँकेच्या विद्यमान यंत्रणेतील तफावतीचे) मूल्यमापन करण्याची यंत्रणा आणि अशा घटनांमुळे उद्भवणाऱ्या जबाबदाऱ्यांचे मोजमाप करण्याची यंत्रणा;
- जोखीम कमी करण्यासाठी आणि त्यातून उद्भवणाऱ्या जबाबदाऱ्यांपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी योग्य उपाय;
- इलेक्ट्रॉनिक बँकिंग आणि पेमेंट्सशी संबंधित फसवणुकीपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे याबद्दल ग्राहकांना सतत आणि वारंवार सल्ला देणारी एक प्रणाली
- अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांसाठी ग्राहकांना नुकसान भरपाई देण्यासाठी पारदर्शक, भेदभाव न करणारी आणि निर्धारित यंत्रणा

बँकिंगमध्ये तंत्रज्ञानाचा वापर

- **डिजिटल बँकिंग 'सोयीस्कर' आणि 'सुरक्षित' देखील आहे. कधीही, कुठेही व्यवहार करा.**
- चुटकीसरशी बँकिंग करणे, आपल्या घरातून आरामात
- जलद आणि सुरक्षित देयकांद्वारे वेळ वाचवते
- विविध व्यवहारांसाठी अनेक डिजिटल पेमेंट्सचे पर्याय
- एन.ई.एफ.टी, आय.एम.पी.एस, यू.पी.आय आणि बी.बी.पी.एस 24x7 उपलब्ध आहे

स्मार्टफोन किंवा इंटरनेट उपलब्ध नाही का?

***99# चा वापर करून डिजिटल बना**

एक व्यासपीठ जे यूएसएसडी कोड (*99#) डायल करून इंटरनेट कनेक्शनशिवाय फीचर फोन / स्मार्ट फोन वापरुन दोन बँक खात्यांमध्ये पैसे स्थानांतरित करू देते (*99#)

- आपला यू.पी.आय पिन वापरुन, आपल्याला केवळ लाभार्थीचा व्हर्चुअल पत्ता जाणून घेऊन कोणत्याही लाभार्थ्याला आरामात रक्कम पाठविता येईल.
- जर लाभार्थीकडे व्हर्चुअल पत्ता नसेल तर आयएफएससी आणि खाते क्रमांक किंवा बँक खाते किंवा मोबाईल नंबरशी लिंक केलेला आधार क्रमांक याद्वारे लाभार्थीला रक्कम पाठविण्याचा पर्याय सुद्धा उपलब्ध आहे.
- "998 सह, एखाद्या व्यक्तीला यू.पी.आय आणि #998 वर नोंदविलेल्या प्राप्तकर्त्यास रक्कम पाठवविता येईल

एक वेळ नोंदणी प्रक्रिया (वन टाइम रजिस्ट्रेशन प्रोसेस)

1. *99# डायल करा आणि भाषा निवडा
2. आपल्या बँकेच्या आयएफएस कोडचे पहिले 4 अंक लिहा
3. बँक खाते निवडा
4. आपला व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) किंवा यू.पी.आय आय.डी असेल मोबाइल@upi
5. *99*7*1# डायल करून आणि ए.टी.एम कार्डचे शेवटचे 6 अंक आणि ए.टी.एम कार्डच्या मुदत समाप्तीचा महिना आणि वर्ष लिहून यू.पी.आय पिन तयार करा

आपल्याकडे इंटरनेट उपलब्ध असलेला स्मार्टफोन आहे का?

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यू.पी.आय) प्लॅटफॉर्म वापरुन डिजिटल बना

एक व्यासपीठ जे इंटरनेट उपलब्ध असलेल्या मोबाइल फोनचा वापर करून दोन बँक खात्यांमध्ये पैसे स्थानांतरित करू देते

- आपला यू.पी.आय पिन वापरुन, आपल्याला केवळ लाभार्थीचा आभासी पत्ता जाणून घेऊन कोणत्याही लाभार्थ्याला आरामात रक्कम पाठविता येईल. जर लाभार्थीकडे व्हर्चुअल पत्ता नसेल तर आयएफएससी आणि खाते क्रमांक किंवा बँक खाते याद्वारे लाभार्थीला रक्कम पाठविण्याचा पर्याय सुद्धा उपलब्ध आहे.

एक वेळ नोंदणी प्रक्रिया (वन टाइम रजिस्ट्रेशन प्रोसेस)

1. भीम ॲप डाऊनलोड करा
2. ॲप उघडा, डिव्हाइसची नोंदणी करण्यासाठी एक एस.एम.एस बाहेर पाठविला जातो
3. लॉगिन पासकोड तयार करा आणि लॉगिन केल्यानंतर बँक खाते निवडा
4. आपला व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्ही.पी.ए) किंवा यू.पी.आय आय.डी असेल मोबाइल@upi
5. ए.टी.एम कार्डचे शेवटचे 6 अंक, ए.टी.एम कार्डची मुदत समाप्तीचा महिना आणि वर्ष आणि आपल्या मोबाईल नंबरवर मिळालेला ओ.टी.पी लिहून यू.पी.आय पिन तयार करा

ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांसाठी घरपोच (डोअरस्टेप) बँकिंग सेवा

आर.बी.आय ने बँकांना ज्येष्ठ नागरिकांसाठी बँकिंग सोयीस्कर बनविण्यास सांगितलेले आहे

- जर आपले वय 70 वर्षांपेक्षा जास्त असेल तर आपल्याला आपल्या घरी काही मूलभूत बँकिंग सुविधा मिळू शकतात
- बँकांच्या नोंदींमध्ये उपलब्ध असलेल्या जन्मतारखेच्या आधारे बँका आपोआपच पूर्णपणे के.वाय.सी अनुरूप खाते 'सीनिअर सिटिझन अकाउंट' मध्ये रूपांतरित करतात
- बँका त्यांच्या शाखांमध्ये समर्पित काउंटर प्रदान करतात जेथे ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या बँकिंग गरजांसाठी प्राधान्य दिले जाते



दिव्यांग नागरिकांसाठी बँकिंग सेवा

- थर्ड पार्टी चेकसह चेकबुक सुविधा, ए.टी.एम सुविधा, नेट बँकिंग सुविधा, लॉकर सुविधा, किरकोळ कर्ज, क्रेडिट कार्ड इत्यादी सर्व बँकिंग सुविधा कोणत्याही भेदभावाशिवाय दृष्टिहीनांना नेहमीच दिल्या जातील याची बँका खात्री करतात
- **ब्रेल कीपॅड**सह कमीतकमी एक बोलके ए.टी.एम सामान्यत: प्रत्येक भागात दृष्टिहीन व्यक्तींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असते

- व्हीलचेअर वापरणाऱ्या/ अपंग व्यक्तींना ते सहज उपलब्ध व्हावेत आणि व्हीलचेअर वापरणाऱ्या व्यक्तींना ते वापरताना अडथळा निर्माण होणार नाही, अशा पद्धतीने व्यवस्था करता यावी म्हणून बँका सध्या अस्तित्वात असलेल्या **सर्व ए.टी.एम/ भविष्यातील ए.टी.एम मध्ये उतार (रॅम्प्स)** असतील याची काळजी घेतात.
- **बँक शाखांच्या प्रवेशद्वारावर उतार (रॅम्प्स) उपलब्ध करून देऊन बँका योग्य ती पावले उचलतात** जेणेकरून अपंग व्यक्ती / व्हीलचेअर वापरणारी व्यक्ती बँक शाखांमध्ये प्रवेश करू शकतील आणि जास्त अडचणी न जाणवता व्यवसाय करू शकतील.

एम.एस.एम.ई / स्वयं-सहाय्यता गटांना उपलब्ध बँकिंग सेवा

एस.एच.जी बचत खात्यांसाठी

- एस.एच.जी चे बचत बँक खाते उघडताना एस.एच.जी च्या सर्व सदस्यांची के.वाय.सी पडताळणी करण्याची गरज नाही.
- सर्व पदाधिकाऱ्यांची के.वाय.सी पडताळणी पुरेशी असेल.
- तथापि, एस.एच.जी च्या वतीने खाते उघडण्यास अधिकृत पदाधिकाऱ्यांचे नाव दर्शविणारा एस.एच.जी चा ठराव सादर करावा लागेल.

मार्जिन आणि सुरक्षा नियम

- कर्ज घेण्यासाठी एस.एच.जी कडून कोणतीही संपार्श्विक सुरक्षा घेण्याची गरज नाही
- कॉर्पसच्या चारपट अधिक कर्जाची रक्कम शक्य आहे जर
  - एस.एच.जी अनेक वर्षांपासून यशस्वीरित्या कार्य करत आहेत.
  - एस.एच.जी यांनी मागील कर्जाची परतफेड वेळेवर केलेली आहे.
  - एस.एच.जी यांनी क्रेडिट सुविधेचा जबाबदारीने वापर केलेला आहे.

ऐच्छिक बचत

- ऐच्छिक बचतीची गणना दोन प्रकारे केली जाऊ शकते:
  - ❖ गट कॉर्पसचा एक भाग न असणे
  - ❖ गट कॉर्पसचा एक भाग म्हणून आणि आंतर-गट कर्ज देण्यासाठी वापरले जाणे
- बँकेकडून गटाला कर्जाच्या प्रमाणाचे मूल्यांकन करण्यासाठी ऐच्छिक बचत देखील मोजली जाईल ज्यामुळे आपल्या एस.एच.जी ला फायदा होऊ शकेल कारण एस.एच.जी ला बँकेकडून मोठ्या प्रमाणात कर्ज मिळू शकते. गटाच्या सदस्यांद्वारे स्वेच्छेने केलेली बचत ही व्याज उत्पन्नातील प्रमाणबद्ध भागासाठी किंवा गटाकडून लाभांश यांच्यासाठी पात्र आहे की नाही याबाबतीत एस.एच.जी चे सदस्य एकत्रितपणे निर्णय घेतील.

AXIS BANK